पुढारी

# रवळनाथ फायनान्सतर्फे सहकार सप्ताहाचे आयोजन

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे अखिल भारतीय सहकार सप्ताहाचे आयोजन केले आहे. दि. १४ ते २० नोव्हेंबरपर्यंत विविध कार्यक्रम घेणार असल्याची माहिती 'रवळनाथ'चे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

दि. १४ रोजी संस्थेच्या प्रधान कार्यालयात सकाळी १० वा. सप्ताहाची सुरुवात होणार आहे. दि. १५ रोजी सकाळी १० वा. रवळनाथ हौसिंग फायनान्स व गडहिंग्लज अर्बन बँकेच्या संयुक्त विद्यमाने शहरातून सहकार दिंडी काढण्यात येणार आहे. दि. १६ रोजी दुपारी २ वा. सहकार परिषदेचे आयोजन केले आहे. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर हे 'सहकारातील नवे बदल' या विषयावर मार्गदर्शन करणार असून, कोल्हापूर जिल्हा उपनिबंधक नीलकंठ करे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. दि. १७ रोजी सकाळी ११ वा. चार्टर्ड अकौंटंट धीरज देशपांडे हे वेबिनारच्या माध्यमातून डिजिटलायझेशन व सायबर सिक्युरीटी याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. दि. २० रोजी सप्ताहाच्या सांगता समारंभ प्रसंगी महिला बचत गटांचा मेळावा आयोजित केला आहे. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी नंदिनी आवडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सांगली या सहकारातील महिलांचा सहभाग याविषयी मार्गदर्शन करणार आहेत. गडहिंग्लज, आजरा व चंदगड तालुक्यांतील सहकारी संस्था व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहुन कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'रवळनाथ'तर्फे करण्यात आले आहे.

My Kolhapur Edition
Nov 11, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in